0 9 MAY 2026

लोकमत

# कपिल राजहंस यांच्या 'दस्तावेज' डिझाइनला भारत सरकारचे पेटंट

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** इचलकरंजीतील जयवंत महाविद्यालयाच्या इतिहास विभागातील सहाय्यक प्राध्यापक प्रा. कपिल राजहंस यांनी ऐतिहासिक दस्तऐवज आणि दुर्मिळ वस्तूंच्या सुरक्षित प्रदर्शनासाठी विकसित केलेल्या 'डिजिटल इंटरॅक्टिव्ह म्युझियम डिस्प्ले टर्मिनल' या उपकरणाला भारत सरकारचे इंडस्ट्रियल डिझाइन पेटंट प्राप्त झाले आहे. प्रा. राजहंस यांनी या पेटंट डिझाइनला "दस्तावेज" असे नाव दिले आहे. प्रा. राजहंस यांनी 'म्युझियोलॉजी' आणि 'डिजिटल ह्युमॅनिटीज'चा वापर करून हे विशेष उपकरण (प्रोटोटाइप) विकसित केले आहे. याद्वारे दुर्मिळ हस्तलिखिते, मोडी दस्तऐवज आणि उत्खननातून मिळालेल्या वस्तूंचे आयुष्य वाढवून त्यांचे प्रभावी डिजिटल प्रदर्शन करणे शक्य होणार आहे.



त्यांना जयवंतराव आवळे शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक माजी मंत्री जयवंतराव आवळे, संस्थेचे अध्यक्ष संजय आवळे, माजी आमदार राजूबाबा आवळे आणि प्राचार्य दिलावर जमादार आदींचे प्रोत्साहन लाभले. (वा.प्र.)